## पोलीस उपनिरीक्षक परीक्षा

**१. संवर्ग व पदे याबाबतचा संक्षिप्त तपशील :**

**१.१** राज्य शासनाच्या सेवेतील पोलीस उपनिरीक्षक, गट-ब (अराजपत्रित) संवर्गातील पदे शासनाच्या मागणीनुसार व पदांच्या उपलब्धतेनुसार सदर परीक्षेमधून भरण्यात येतात.

**१.२ पदांचा तपशील :-**

**(१) संवर्ग :** अराजपत्रित, गट - ब.

**(२) नियुक्तीचे ठिकाण :** राज्य शासनाच्या पोलीस दलाच्या महाराष्ट्रातील कोणत्याही कार्यालयात.

**(३) वेतनबँड व ग्रेड वेतन** - रुपये ९३००-३४८००,४३०० अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय इतर भत्ते.

**(४) उच्च पदावर बढतीची संधी** - ज्येष्ठता व पात्रतेनुसार सहायक पोलीस निरीक्षक व त्यावरील पदे.

**१.३** शासनाच्या मागणीनुसार भरावयाच्या पदांचा तपशील, पदसंख्या, आरक्षण, अर्हता, इत्यादी बाबी जाहिरात / अधिसूचनेद्वारे उमेदवारांना उपलब्ध करू न देण्यात येईल.

**२. परीक्षेचे टप्पे :-**

**२.१** प्रस्तुत परीक्षा एकूण चार टप्प्यात घेण्यात येते :-

(१) पूर्व परीक्षा - ३०० गुण. (२) मुख्य परीक्षा - ४०० गुण. (३) शारीरिक चाचणी - २०० गुण (४) मुलाखत - ७५ गुण

**२.२** पूर्व परीक्षा ही मुख्य परीक्षेसाठी उमेदवारांची संख्या विहित मर्यादेत सिमित करण्यासाठी घेण्यात येते. या करीता पूर्व परीक्षेसाठी आयोगाने विहित केलेल्या किमान सीमारेषा किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळविणा-या उमेदवारांस मुख्य परीक्षेसाठी पात्र समजण्यात येईल. पूर्व परीक्षेचे गुण अंतिम निवडीच्या वेळी विचारात घेतले जाणारी नाहीत. तसेच, पूर्व परीक्षेचे गुण उमेदवारांना कळविले जाणार नाहीत.

**२.३** *मुख्य परीक्षेकरिता आयोगाने विहित केलेले किमान किंवा अधिक गुण मिळविणारे उमेदवार* शारिरीक चाचणीसाठी पात्र ठरतात व शारीरिक चाचणीमध्ये किमान १०० गुण मिळविणारे उमेदवार मुलाखतीसाठी पात्र ठरतात.

**२.४**जाहिरातीतील तरतुदीनुसार विहित अटींची पूर्तता करणा-या व मुलाखतीच्या वेळी सर्व मूळ कागदपत्रे सादर करणाऱ्या उमेदवारांची मुलाखत घेण्यात येते.

**३. अर्हता :**

**३.१** मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी किंवा महाराष्ट्र शासनाने विहित केलेली समतुल्य अर्हता.

**३.२** मराठीचे ज्ञान आवश्यक.

**३.३** पदवीच्या शेवटच्या वर्षाच्या परीक्षेस बसलेले उमेदवार पूर्व परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र असतील. परंतु मुख्य परीक्षेकरीता अर्हताप्राप्त ठरल्यास मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी विहित पद्धतीने आवश्यक माहिती व परीक्षा शुल्क सादर करण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत पदवी परीक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य राहील.

**३.४ शारीरिक पात्रता** -

| पुरुष उमेदवारांकरिता | महिला उमेदवारांकरिता |
|---|---|
| उंची - १६५ सें. मी. (अनवाणी) (कमीत कमी)<br>छाती - न फुगविता ७९ से.मी.<br>फुगविण्याची क्षमता किमान ५ से.मी. आवश्यक | उंची - १५७ सें.मी. (अनवाणी) (कमीत कमी) |

**३.५**प्रस्तुत परीक्षेच्या अंतिम निकालाच्या आधारे शिफारस झालेल्या उमेदवारांची शारिरिक मोजमापे नियुक्ती करण्यापूर्वी शासनामार्फत सक्षम प्राधिका-याकडून तपासून घेण्यात येतील. वरीलप्रमाणे शारीरिक क्षमता न भरल्यास संबंधित उमेदवार नियुक्तीसाठी अपात्र ठरेल.

**४ शुल्क (फी) :**

**४.१** प्रस्तुत भरतींकरिता आयोगाकडून आकारण्यात येणारे शुल्क खालीलप्रमाणे आहे :-

| अ.क्र. | परीक्षेचे नांव | रुपये | |
|---|---|---|---|
| | | अमागास | मागासवर्ग |
| (१) | पूर्व परीक्षा | २६० | १३५ |
| (२) | मुख्य परीक्षा | ३१० | १६० |

**४.२** वि.जा.(अ),भ.ज.(ब),भ.ज.(क),भ.ज.(ड), वि.मा.प्र. व इ.मा.व. प्रवर्गातील उन्नत व प्रगत गटात (क्रिमी लेअर) मध्ये मोडणाऱ्या म्हणजेच ज्यांचे वार्षिक उत्पन्न रुपये ४.५ लाखांपेक्षा अधिक आहे, अशा उमेदवारांनी त्यांना आरक्षणाचा व वयोमर्यादेचा फायदा देय नसल्याने त्यांनी अमागास उमेदवारांप्रमाणे परीक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे.

**४.३** दिनांक १ जानेवारी, १९६४ ते २५ मार्च, १९७१ या कालावधीत पूर्व पाकिस्तानातून स्थलांतर करुन भारतामध्ये आलेल्या आणि दिनांक १ जून, १९६३ नंतर स्थलांतर करून भारतात आलेल्या मूळचे भारतीय असलेल्या श्रीलंकेतील स्वदेश प्रतावर्ती उमेदवारांनी कोणतेही परीक्षा शुल्क भरण्याची आवश्यकता नाही.

## ५. पूर्व परीक्षा :

### ५.१ परीक्षा योजना :

(१) **प्रश्नपत्रिका :** एक. प्रश्नपत्रिकेचा तपशील खालीलप्रमाणे :-

| विषय (संकेतांक ०१२) | प्रश्नांची संख्या | एकूण गुण | दर्जा | माध्यम | परीक्षेचा कालावधी | परीक्षेचे स्वरुप |
|---|---|---|---|---|---|---|
| सामान्य क्षमता | १५० | ३०० | शालांत | मराठी व इंग्रजी | दीड तास | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी |

### ५.२ अभ्यासक्रम :

**सामान्य क्षमता - ( विषय संकेतांक - ०१२ )** या विषयामध्ये खालील घटक / उपघटकांचा समावेश असेल :

(१) अंकगणित : बेरीज, वजाबाकी, गुणाकार, भागाकार, सरासरी, दशांश अपूर्णांक.

(२) भूगोल (महाराष्ट्राच्या भूगोलाच्या विशेष अभ्यासासह) - पृथ्वी, जगातील विभाग, हवामान, अक्षांश-रेखांश, महाराष्ट्रातील जमिनीचे प्रकार, पर्जन्यमान, प्रमुख पिके, शहरे, नद्या, उद्योगधंदे.

(३) भारताचा सामान्य इतिहास - सन १८५७ ते १९४७.

(४) नागरिकशास्त्र आणि अर्थव्यवस्था - भारताच्या घटनेचा प्राथमिक अभ्यास, राज्य व्यवस्थापन (प्रशासन), ग्राम व्यवस्थापन (प्रशासन), भारतीय पंचवार्षिक योजनेची ठळक वैशिष्ट्ये.

(५) सामान्य विज्ञान-भौतिकशास्त्र (फिजिक्स), रसायनशास्त्र (केमिस्ट्री), प्राणिशास्त्र (झूलॉजी), वनस्पतीशास्त्र (बॉटनी), आरोग्यशास्त्र (हायजीन).

(६) महाराष्ट्रातील समाज-सुधारक : गोपाळ गणेश आगरकर, महात्मा जोतिबा फुले, छत्रपती शाहू महाराज, महर्षी धोंडो केशव कर्वे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर.

(७) चालू घडामोडी :- जागतिक तसेच भारतातील.

### ५.३ परीक्षा केंद्र :

( १ ) खालील ठिकाणी सदर पूर्व परीक्षा घेण्यात येईल :-

| केंद्र | संकेतांक |
|---|---|
| अहमदनगर | ११ |
| अकोला | १२ |
| अलिबाग | १३ |
| अमरावती | १४ |
| औरंगाबाद | १५ |
| बीड | १६ |
| भंडारा | १७ |
| बुलढाणा | १८ |
| चंद्रपूर | १९ |
| धुळे | २० |
| गडचिरोली | २१ |
| गोंदिया | २२ |

| केंद्र | संकेतांक |
|---|---|
| हिंगोली | २३ |
| जळगाव | २४ |
| जालना | २५ |
| कोल्हापूर | २६ |
| कुडाळ | २७ |
| लातूर | २८ |
| मुंबई (मध्य) | ३० |
| मुंबई (पश्चिम) | ३१ |
| नागपूर | ३२ |
| नांदेड | ३३ |
| नंदुरबार | ३४ |
| नाशिक | ३५ |

| केंद्र | संकेतांक |
|---|---|
| उस्मानाबाद | ३६ |
| परभणी | ३७ |
| पुणे | ३८ |
| रत्नागिरी | ३९ |
| सांगली | ४० |
| सातारा | ४१ |
| सोलापूर | ४२ |
| ठाणे | ४३ |
| वर्धा | ४४ |
| वाशीम | ४५ |
| यवतमाळ | ४६ |

(२) उपरोक्त परीक्षाकेंद्रांमधून कोणतेही एक केंद्र अर्ज सादर करताना निवडणे आवश्यक आहे.

(३) उपरोक्त परीक्षाकेंद्रांमध्ये आवश्यकतेनुसार वेळोवेळी वाढ अथवा बदल होऊ शकतात.

(४) विहित पद्धतीने माहिती सादर करताना उमेदवाराने निवडलेले परीक्षा केंद्र व उपलब्धतेनुसार जिल्हा केंद्रावरील विविध उपकेंद्रावर पात्र उमेदवारांना प्रवेश देण्यात येईल.

(५) एखादे केंद्र कार्यान्वित होऊ शकले नाही तर त्या केंद्रावरील उमेदवारांची व्यवस्था जवळच्या दुस-या जिल्हा केंद्रावर करण्यात येईल. असा बदल केल्यास त्याबाबतची सूचना संबंधितांना दिली जाईल.

(६) एकदा निवडलेल्या परीक्षा केंद्रामध्ये अथवा आयोगाने निश्चित केलेल्या उपकेंद्रामध्ये बदल करण्याची विनंती कोणत्याही कारणास्तव मान्य करण्यात येणार नाही.

**५.४ पूर्व परीक्षेचा निकाल :**

**५.४.१** भरावयाच्या एकूण पदांपैकी प्रत्येक प्रवर्ग / उपप्रवर्गासाठी सुमारे १० पट उमेदवार उपलब्ध होतील अशा रितीने गुणांची किमान सीमारेषा (Cut Off Line ) निश्चित करण्यात येईल. सदर सीमारेषा सर्व उमेदवारांसाठी एकच किंवा प्रत्येक सामाजिक प्रवर्ग / उपप्रवर्गासाठी तसेच महिला, अपंग, खेळाडू इत्यादींसाठी वेगवेगळी असेल.

**५.४.२** केवळ सर्वसाधारण (अमागास) उमेदवारांच्या सीमारेषेच्या आधारे मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची उमेदवारी अंतिम निवडीच्या वेळी सर्वसाधारण (अमागास) पदासाठी विचारात घेतली जाईल. सर्वसाधारण (अमागास) उमेदवारांसाठी असलेली सीमारेषा शिथिल करुन मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेले उमेदवार अंतिम शिफारशीच्या वेळी फक्त संबंधित आरक्षित पदासाठी पात्र ठरतील.

**५.४.३** प्रत्येक प्रवर्ग / उपप्रवर्गासाठी आयोगाने निश्चित केलेल्या सीमारेषा किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळविणा-या उमेदवारांना त्यांनी पूर्व परीक्षेच्या अर्जामध्ये दिलेल्या माहितीच्या आधारे, ते विहित अटींची पूर्तता करतात असे समजून निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र समजण्यात येईल.

**५.४.४** अशा रितीने मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची यादी संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयाच्या तसेच आयोगाच्या कार्यालयाच्या सूचना फलकावर व आयोगाच्या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात येईल.

**५.४.५** मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांचा निकाल जाहीर झाल्याची बातमी राज्यातील प्रमुख वृत्तपत्रांतून प्रसिद्ध करण्यात येईल. तसेच, मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या प्रत्येक उमेदवाराला ईमेलद्वारे व मोबाईल क्रमांकावर एसएमएसद्वारे वैयक्तिकरित्या कळविण्यात येईल.

**५.४.६** पूर्व परीक्षा ही मुख्य परीक्षेच्या प्रवेशाकरिता उमेदवारांची संख्या मर्यादित करण्याच्या दृष्टिने घेण्यात येणारी चाळणी परीक्षा असल्याने मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र न ठरलेल्या उमेदवारांच्या उत्तरपत्रिकांची फेरतपासणी केली जात नाही अथवा यासंदर्भातील कोणत्याही प्रकारच्या अभिवेदनावर कार्यवाही केली जात नाही.

**६. मुख्य परीक्षा :**

**६.१ परीक्षेचे टप्पे :** लेखी परीक्षा, शारीरिक चाचणी, मुलाखत.

**६.२ परीक्षेस प्रवेश :**

**६.२.१** पूर्व परीक्षेकरीता विहित केलेल्या मर्यादेनुसार मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या आणि आवश्यक शैक्षणिक अर्हता व अन्य अटींची पूर्तता करणा-या उमेदवारास मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र समजण्यात येईल.

**६.२.२** मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांना वैयक्तिकरित्या ईमेलद्वारे व मोबाईल क्रमांकावर एसएमएसद्वारे कळविण्यात येईल. त्यावेळी उमेदवाराने मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी आयोगाने विहित केलेल्या ऑनलाईन पद्धतीने परीक्षा केंद्र निवडून चलनाद्वारे परीक्षाशुल्क सादर करणे आवश्यक राहील. त्याशिवाय उमेदवारास मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र समजण्यात येणार नाही.

**६.२.३** प्रस्तुत पदाच्या पूर्व परीक्षेसाठी अर्ज करतेवेळी आवश्यक ती शैक्षणिक अर्हता नसल्यास व शैक्षणिक अर्हता मुख्य परीक्षेकरिता आवश्यक माहिती व परीक्षा शुल्क सादर करण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत प्राप्त केल्यास, अशा उमेदवाराला शैक्षणिक अर्हता प्राप्त केल्याचा दिनांक नमूद करता येईल. इतर कोणत्याही दाव्यामध्ये बदल करता येणार नाही.

**६.३ परीक्षा योजना :**

**६.३.१ प्रश्नपत्रिकेचे स्वरूप :-** वस्तुनिष्ठ बहुपर्यायी.

**६.३.२ एकूण गुण :-** ४००

**६.३.३ प्रश्नपत्रिकांची संख्या :-** दोन. प्रत्येक प्रश्नपत्रिकेचा तपशील खालीलप्रमाणे :-

| पेपर क्रमांक व संकेतांक | विषय | गुण | दर्जा | माध्यम | कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १ (संकेतांक ०२) | मराठी व | १३० | मराठी -बारावी | मराठी | दोन तास |
| | इंग्रजी | ७० | इंग्रजी - पदवी | इंग्रजी | |
| २ (संकेतांक ०२७) | सामान्य ज्ञान, बुद्धिमापन व विषयाचे ज्ञान | २०० | पदवी | इंग्रजी व मराठी | दोन तास |

**६.३.४ अभ्यासक्रम :-**

**(एक) पेपर क्रमांक १ -** इंग्रजी व मराठी- सर्वसामान्य शब्दसंग्रह, वाक्यरचना, व्याकरण, म्हणी व वाक्प्रचार यांचा अर्थ आणि उपयोग, तसेच उताऱ्यांवरील प्रश्नांची उत्तरे.

**(दोन) पेपर क्रमांक २-** सामान्य ज्ञान, बुध्दिमापन व विषयाचे ज्ञान : या विषयामध्ये खालील घटक / उपघटकांचा समावेश असेल :-

(१) **चालू घडामोडी (३० गुण)** :- जागतिक तसेच भारतातील.

(२) **बुध्दिमत्ता चाचणी (४० गुण)** :- अंकगणित, बेरीज, वजाबाकी, गुणाकार, भागाकार, सरासरी, दशांश व अपूर्णांक, तसेच बुध्दयांक मापनाशी संबंधीत प्रश्न.

(३) **मुंबई पोलीस कायदा (१० गुण)**

(४) **मानवी हक्क व जबाबदा-या (४० गुण)** :- संकल्पना- आंतरराष्ट्रीय मानवी हक्क मानक, त्यासंदर्भातील भारतीय राज्यघटनेतील तरतूद, भारतातील मानवी हक्क व जबाबदा-या यंत्रणेची अंमलबजावणी व संरक्षण, भारतातील मानवी हक्क चळवळ, मानवी हक्कापासून वंचित राहण्याच्या समस्या, गरीबी, निरक्षता, बेकारी, सामाजिक- सांस्कृतिक- धार्मिक प्रथा यासारख्या अडचणी, (हिंसाचार, भ्रष्टाचार, दहशतवाद, कामगारांचे शोषण, संरक्षित गुन्हेगारी, इत्यादी.) लोकशाहीव्येवस्थेतील एकमेकांचे हक्क आणि मानवी प्रतिष्ठा व एकतेचा आदर करण्यासंबंधी प्रशिक्षणाची गरज व महत्व, नागरी हक्क संरक्षण अधिनियम १९५५, मानवी हक्क संरक्षण अधिनियम १९९३, कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम २००५, कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे सरक्षण नियम २००५, अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचारास प्रतिबंध) अधिनियम १९८९, हुंडाबंदी अधिनियम १९६१, महात्मा गांधी तंटामुक्ती अभियान.

(५) **महाराष्ट्राचा भूगोल (४० गुण)** :- महाराष्ट्राचा रचनात्मक (Physical) भूगोल, मुख्य रचनात्मक (Physiographic) विभाग, Climate, पर्जन्यमान व तापमान, पर्जन्यातील विभागवार बदल, नद्या, पर्वत व डोंगर, राजकीय विभाग, प्रशासकीय विभाग, नैसर्गिक संपत्ती- वने व खनिजे, मानवी व सामाजिक भूगोल- लोकसंख्या (Population), Migration of Population व त्याचे Source आणि Destination वरील परिणाम, ग्रामीण वस्त्या व तांडे, झोपडपट्टया व त्यांचे प्रश्न, संत गाडगे बाबा ग्राम स्वच्छता अभियान.

(६) **महाराष्ट्राचा इतिहास (२५ गुण)** :- सामाजिक व अर्थिक जागृती (१८८५-१९४७), महत्वाच्या व्यक्तींचे काम, स्वातंत्र्यपूर्व भारतातील सामाजिक जागृतीतील वर्तमानपत्रे व शिक्षणाचा परिणाम / भाग, स्वातंत्र्यपूर्व काळातील इतर समकालीन चळवळी (सत्यशोधक समाज, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची चळवळ, हिंदू महासभा, मुस्लीम लीग, राष्ट्रीय क्रांती चळवळ, डावी विचारसरणी / कम्युनिष्ट चळवळ, शेतकरी चळवळ, आदिवासींचा उठाव.)

(७) **भारतीय राज्यघटना (१५ गुण)** :- घटना कशी तयार झाली आणि घटनेच्या प्रस्तावनेमागची भूमिका व तत्वे, घटनेची महत्वाची कलमे / ठळक वैशिष्टये, केंद्र व राज्य संबंध, निधर्मी राज्य, मूलभूत हक्क व कर्तव्ये, राज्याच्या धोरणाची मार्गदर्शक तत्वे-शिक्षण, युनीफॉर्म सिव्हील कोड, स्वतंत्र न्यायपालिका.

**६.३.५ परीक्षा केंद्र :**

(१) खालील चार ठिकाणी सदर मुख्य परीक्षा घेण्यात येईल :-

| केंद्र | केंद्राचा सांकेतांक |
|---|---|
| औरंगाबाद | **१५** |
| मुंबई | **३०** |

| केंद्र | केंद्राचा सांकेतांक |
|---|---|
| नागपूर | **३२** |
| पुणे | **३८** |

(२) उपरोक्त परीक्षाकेंद्रांमधून कोणतेही एक केंद्र मुख्य परीक्षेकरिता माहिती सादर करताना निवडणे आवश्यक आहे.

(३) उपरोक्त परीक्षाकेंद्रांमध्ये आवश्यकतेनुसार वेळोवेळी वाढ अथवा बदल होऊ शकतात.

(४) विहित पद्धतीने माहिती सादर करताना उमेदवाराने निवडलेले परीक्षा केंद्र व उपलब्धतेनुसार जिल्हा केंद्रावरील विविध उपकेंद्रावर पात्र उमेदवारांना प्रवेश देण्यात येईल.

(५) एखादे केंद्र कार्यान्वित होऊ शकले नाही तर त्या केंद्रावरील उमेदवारांची व्यवस्था जवळच्या दुसऱ्या जिल्हा केंद्रावर करण्यात येईल. असा बदल केल्यास त्याबाबतची सूचना संबंधितांना दिली जाईल.

(६) एकदा निवडलेल्या परीक्षा केंद्रामध्ये अथवा आयोगाने निश्चित केलेल्या उपकेंद्रामध्ये बदल करण्याची विनंती कोणत्याही कारणास्तव मान्य करण्यात येणार नाही.

**६.३.६ लेखी परीक्षेचा निकाल :-**

(१) भरावयाच्या एकूण पदांपैकी प्रत्येक आरक्षित प्रवर्ग / उपप्रवर्गासाठी सुमारे ४ पट उमेदवार शारीरिक चाचणीसाठी उपलब्ध होतील,अशा रितीने गुणांची किमान सीमारेषा (Cut Off Line) निश्चित करण्यात

येईल. सदर सीमारेषा सर्व उमेदवारांसाठी एकच किंवा प्रत्येक सामाजिक प्रवर्ग/उपप्रवर्गासाठी तसेच महिला, खेळाडू इत्यादींसाठी वेगवेगळी असेल.

(२) प्रत्येक प्रवर्ग / उपप्रवर्गासाठी आयोगाने निश्चित केलेल्या सीमारेषा किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळविणा-या उमेदवारांना त्यांनी मुख्य परीक्षेच्या अर्जामध्ये दिलेल्या माहितीच्या आधारे, ते विहित अटींची पूर्तता करतात असे समजून निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पात्र समजण्यात येईल.

(३) अमागास उमेदवाराकरिता लेखी परीक्षेमध्ये किमान ३५% गुण, तर मागास उमेदवाराकरिता किमान ३०% गुण प्राप्त होणे आवश्यक राहील. तसेच, माजी सैनिक व गुणवत्ताधारक पात्र खेळाडूंकरिता लेखी परीक्षेमध्ये किमान २०% गुण प्राप्त होणे आवश्यक राहील. तथापि, उमेदवारास वरीलपैकी कोणतीही एकच सवलत मिळेल.

(४) लेखी परीक्षेचा निकाल जाहीर झाल्याची बातमी राज्यातील प्रमुख वृत्तपत्रांतून प्रसिद्ध करण्यात येईल. तसेच, शारीरिक चाचणी आणि मुलाखतीसाठी पात्र ठरलेल्या प्रत्येक उमेदवाराला ईमेलद्वारे व मोबाईल क्रमांकावर एसएमएसद्वारे वैयक्तिकरित्या कळविण्यात येईल.

(५) अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती तसेच उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र असलेल्या विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड), विशेष मागास प्रवर्ग व इतर मागास वर्ग या प्रवर्गातील उमेदवार तसेच अपंग, महिला, माजी सैनिक व पात्र खेळाडू उमेदवार लेखी परीक्षेत केवळ त्यांच्यासाठी विहित केलेल्या निम्न सीमारेषेनुसार अर्हताप्राप्त झाल्यास अंतिम शिफारशींच्या वेळी त्यांची उमेदवारी केवळ त्या त्या संबंधित प्रवर्गासाठी विचारात घेतली जाईल. निम्न सीमारेषेनुसार अर्हताप्राप्त ठरलेल्या उमेदवारांची उमेदवारी सर्वसाधारण (अमागास) पदासाठी विचारात घेतली जाणार नाही.

**७. शारीरिक चाचणी - एकूण २०० गुण.**

**७.१** मुख्य परीक्षेकरीता आयोगाने विहित केलेले किमान किंवा अधिक गुण मिळविणारे उमेदवार शारीरिक चाचणीसाठी पात्र ठरतील. अशा उमेदवारांना शारीरिक चाचणीसाठी आयोगाने विहित केलेल्या दिनांकास व ठिकाणी उमेदवाराला स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

**७.२** उंची व छातीविषयक विहित मोजमापाच्या अटी पूर्ण करणा-या उमेदवारांचीच शारीरिक चाचणी घेण्यात येईल. सदर चाचणी पुरुष व महिलांसाठी स्वतंत्र असेल.

**७.३ शारीरिक चाचणीचा तपशील :**

| पुरुषांसाठी | महिलांसाठी |
|---|---|
| (१) गोळाफेक-वजन-७.२६० कि.ग्रॅ. - कमाल गुण - ३० | (१) गोळाफेक-वजन-४ कि.ग्रॅ.- कमाल गुण - ४० |
| (२) पुल अप्स - कमाल गुण - ४० | (२) धावणे ( २०० मीटर्स ) - कमाल गुण - ८० |
| (३) लांब उडी - कमाल गुण - ३० | (३) चालणे (३ कि.मी.) - कमाल गुण - ८० |
| (४) धावणे (८०० मीटर्स ) - कमाल गुण - १०० | |

**७.४** शारीरिक चाचणीच्या वेळी उंची व छातीविषयक विहित मोजमापाच्या अटी पूर्ण न करणा-या उमेदवारांची उंची / छाती मापनाविषयी काही तक्रार असल्यास त्यांनी त्याच दिवशी आयोगाकडे आपला तक्रार अर्ज सादर करणे आवश्यक आहे. याबाबत योग्य तो विचारविनिमय करुन अपात्र उमेदवारांच्या उंची / छातीचे फेरमापन घेण्याकरिता उमेदवारांना स्वतंत्रपणे कळविण्यात येईल. आयोगाच्या वेळापत्रकानुसार अशा उमेदवारांच्या उंची व छातीविषयक फेरमोजमापनाकरिता दिनांक, वेळ व ठिकाण निश्चित करण्यात येईल. फेरमापनाच्या अनुषंगाने पात्र ठरणा-या उमेदवारांची शारीरिक चाचणी त्याच दिवशी घेण्यात येईल. तसेच शारीरिक चाचणीत पात्र ठरणा-या उमेदवारांची मुलाखत त्याच दिवशी , अथवा स्वतंत्रपणे घेण्यात येईल.

**७.५** शारीरिक चाचणीच्या सरावासाठी उमेदवार राज्यातील पोलीस कवायत मैदानांचा उपयोग करू शकतील आणि पोलीस मुख्यालयातील पोलीस उपायुक्तांच्या, तसेच पोलीस अधिक्षकांच्या परवानगीने निदेशकांची मदत घेऊ शकतील.

**७.६** शारीरिक चाचणीमध्ये किमान १०० गुण मिळविणा-या उमेदवारांची मुलाखत आयोगाने निर्धारित केलेल्या दिनांकास व ठिकाणी घेण्यात येईल. त्याकरिता उमेदवारास स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

**८. मुलाखत :-**

**८.१** शारीरीक चाचणीच्या निकालाच्या आधारे मुलाखतीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांनाच पोलीस उपनिरीक्षक पदाच्या मुलाखतीसाठी बोलाविण्यात येईल. पोलीस उपनिरीक्षक पदासाठी मुलाखत ७५ गुणांची असेल.

**८.२** मुलाखतीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची पात्रता जाहिरात/अधिसूचनेतील अर्हता/अटी व शर्तीनुसार मूळ कागदपत्राच्या आधारे तपासली जाईल आणि अर्जातील दाव्यानुसार मूळ कागदपत्र सादर करणा-या उमेदवारांची मुलाखत घेतली जाईल. विहित कागदपत्रे सादर करू न शकणा-या उमेदवारांची उमेदवारी रद्द करण्यात येईल व त्याची मुलाखत घेतली जाणार नाही. तसेच त्याकरिता कोणतीही मुदतवाढ देण्यात येणार नाही.

**८.३** मुलाखतीसाठी पात्र ठरणा-या उमेदवारांच्या मुलाखती आयोगाच्या कार्यक्रमानुसार तसेच आयोगाने निश्चित केलेल्या ठिकाणी व वेळेस घेण्यात येतील.

**९. अंतिम निकाल** – मुख्य परीक्षा, शारिरिक चाचणी आणि मुलाखतीमध्ये प्राप्त केलेल्या गुणांची एकत्रित बेरीज करुन गुणवत्ताक्रमानुसार यादी तयार करण्यात येईल. सदर गुणवत्ता यादीमध्ये समान गुण धारण करणाऱ्या उमेदवारांचा प्राधान्यक्रम (Ranking) `` **उमेदवारांना सर्वसाधारण सूचना**`` मध्ये नमूद केलेल्या निकषानुसार ठरविण्यात येईल.

**१०. शिफारस :-**

(१)"**उमेदवारांना सर्वसाधारण सूचना**" मध्ये नमूद केलेल्या कार्यपद्धतीनुसार उमेदवारांच्या शिफारसी शासनाच्या संबंधित विभागाकडे पाठविण्यात येतील.

(२) मुलाखत घेतलेल्या उमेदवारांना मुलाखतीनंतर शक्य तितक्या लवकर, त्यांची नियुक्तीसाठी शिफारस करण्यात आलेली आहे किंवा नाही ते कळविण्यात येईल व शिफारस झालेल्या उमेदवारांची नांवे आयोगाच्या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात येतील.

************